सुविचार

कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com




**मलकापूर गावातील जलजीवन मिशन योजनेचे काम दीड वर्षापासून बारगळले**

पेज ४


■ दैनिक ■धाराशिव ■वर्ष 2 रे ■ अंक 117 ■ शुक्रवार दि.6 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5


# अनुदानावरील मोफत बियाण्याचा सावळा गोंधळ सुरूच

## सर्व्हर डाऊनच्या समस्येने हैराण झालेल्या शेतकऱ्यांची बियाणे मिळवतानाही कसरत

### नियोजनाअभावी चांगल्या योजनेचा उडाला फज्जा

### शेतकऱ्यांचा कृषी सेवा केंद्रावरच मुक्काम

आरंभ मराठी | धाराशिव

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियानाअंतर्गत पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व खरीप हंगामासाठी कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर सोयाबीन बियाणे वितरित करण्याची चांगली योजना राज्य सरकारने आणली. परंतु, योग्य नियोजनाअभावी चांगल्या योजनेचा फज्जा उडाल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. अगोदर पोर्टलची तांत्रिक समस्या, त्यानंतर जाहीर केलेली निवड यादी आणि बियाणे वितरणात झालेला गोंधळ यांमुळे या योजनेचा पुरता बोजवारा उडाला. नंबर लागलेल्या शेतकऱ्यांना बियाणे मिळवताना कित्येक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यातून कृषी सेवा केंद्र चालकांसोबत वादवादीच्या घटना घडत आहेत.

महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेल्या मोफत सोयाबीन बियाणे वाटप योजनेत तांत्रिक अडचणींमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. अर्ज करण्यासाठी ३० मे ही अंतिम तारीख होती. मात्र, तांत्रिक अडचणी लक्षात घेता अर्ज करण्यासाठी मुदत २ जूनपर्यंत वाढवण्यात आली. पण या वाढीव कालावधीतही अनेक शेतकऱ्यांना अर्ज करता आले नाही. काहींनी अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शुल्क भरले, तरीही अर्ज सबमिट झाला नाही आणि त्याचा कोणताही मेसेज प्राप्त झाला नाही. कृषी विभागाने निवड यादी जाहीर केली असून, त्यांना बियाण्याचे वाटप सुरू केले आहे. मात्र वाटप होताना देखील यात मोठा गोंधळ होत असून, यामध्ये हाल मात्र शेतकऱ्यांचे होत आहेत. बियाणे वाटपासाठी मोजक्याच कृषी सेवा केंद्रांवर बियाणे उपलब्ध केल्यामुळे त्या सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांनी प्रचंड गर्दी केल्याचे चित्र पहायला मिळाले. त्यातच काही ठिकाणी हाणामारीचे प्रसंग उद्भवले.





### पहिल्याच दिवशी बियाणे संपल्यामुळे गर्दी

धाराशिव शहरात एकूण सहा कृषी सेवा केंद्रांवर बियाण्याचे वाटप करण्यात आले. यापैकी तीन केंद्रावरील बियाणे पहिल्या दोन दिवसातच संपल्यामुळे राहिलेल्या तीन केंद्रांवर शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. यातून वादावादीचे अनेक प्रसंग घडले. कृषी सेवा केंद्र चालकांना शेतकऱ्यांकडून कागदपत्रे घेऊ नका असे कृषी विभागाने सांगूनही त्यांच्याकडून सातबारा, आधारकार्ड ही कागदपत्रे सक्तीने मागितली जात आहेत त्यामुळेही गोंधळ वाढला.

### लोहारा तालुक्यातील एकही शेतकरी लाभार्थी नाही

लाभार्थी निवड यादीमध्ये धाराशिव जिल्ह्यातून लोहारा तालुक्यातील एकही लाभार्थी निवडला गेला नाही. ऍग्रीस्टॅकची कमी नोंदणी, पोर्टलची तांत्रिक समस्या यामुळे लोहारा तालुक्यातून अर्ज दाखल झाले नाहीत. कृषी विभागाने आजपासून लोहारा तालुक्यासाठी ऑफलाईन अर्ज मागवले असून, गावोगावी लकी ड्रॉ काढून लाभार्थी निवडले जाणार असल्याचे कृषी विभागाने सांगितले.



### लाभार्थ्यांना समसमान वाटप नाही

यातील लाभार्थी शेतकऱ्यांना समसमान वाटप न केल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. योजनेमध्ये शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ किलो बियाणे वाटप केले जाईल असे नमूद आहे. मात्र शेतकऱ्यांना हेक्टरी ६६ किलो बियाणे देण्यात आले. महाबीजची बॅग २२ किलोची असल्यामुळे ७५ किलो बियाणे देणे शक्य नसल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले. मात्र महाबीजकडून ग्रामीण भागात ३० किलोच्या बॅग देण्यात आल्या आहेत. त्या भागातील शेतकऱ्यांना ३० किलोची एक बॅग आणि २२ किलोच्या २ बॅग असे ७४ किलो बियाणे वाटप करण्यात आले. त्यामुळे काही शेतकऱ्यांना योजनेचा पुरेपूर लाभ मिळाला तर काही शेतकऱ्यांनी कृषी सेवा केंद्रासोबत वाद घातल्यामुळे गोंधळ वाढला.

### लाभार्थ्यांच्या निवडीतच गोंधळ

या योजनेच्या लाभार्थी निवडीतच मोठा गोंधळ झाला. महाडीबीटी पोर्टलला तांत्रिक समस्या असल्यामुळे ९० टक्के शेतकऱ्यांचे अर्ज पेमेंट होऊनही सबमिट झाले नाहीत. त्यामुळे काही गावात शंभर लाभार्थी निवडले तर काही गावात एकही लाभार्थी निवडला गेला नाही. त्यामुळे पेमेंट होऊनही लाभार्थी म्हणून निवड न झालेल्या शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

### कृषी विभाग आणि महाबीज यांच्यात समन्वयाचा अभाव

कृषी विभाग आणि महाबीज यांच्यात समन्वयाचा अभाव असल्यामुळे योजना राबविताना गोंधळ वाढला. महाबीज कडून दरवर्षी २५ किलो आणि ३० किलोमध्ये बियाण्याची पॅकिंग केली जाते. यावर्षी महाबीजने २२ किलो आणि ३० किलो या प्रमाणात पॅकिंग केली. त्यामुळे हेक्टरी ७५ किलो बियाणे कसे द्यायचे? हा प्रश्न कृषी विभागाला पडला. त्यामुळे २२ किलोच्या तीन बॅग देण्याचे निश्चित केले. तसेच महाबीजकडून ३० किलो बियाण्याचे वितरण कुठल्या भागात केले आहे याची माहिती महाबीजकडून कृषी विभागाला देण्यात आली नाही.

## शेतावरून वाद; चार जणांकडून महिलेला बेदम मारहाण

आरंभ मराठी | कळंब

शेतीच्या कारणावरून वाद होऊन चार जणांच्या जमावाने एका महिलेला बेदम मारहाण केल्याची घटना कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी गावच्या शिवारात घडली. यातील आरोपी भाग्यश्री जयदीप जगताप, रामेश्वर रावण जगताप, अशोक रामेश्वर जगताप, जयदीप रामेश्वर जगताप (सर्व रा. कन्हेरवाडी ता. कळंब) यांनी दिनांक ३ जून रोजी कन्हेरवाडी शिवारातील शेतात (गट नं १६१) फिर्यादी शिलाताई रामभाउ जगताप (वय ५० वर्षे, रा. कन्हेरवाडी) यांना आरोपींनी शेतीच्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली.शिलाताई जगताप यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून कळंब पो ठाणे येथेभा.न्या.सं.कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## कोल्हापुरात पावसाने उडवली धावपळ

आरंभ मराठी | कोल्हापूर

अवेळीच्या पावसाने आजही कोल्हापूरवासियांची पुन्हा धावपळ उडाली, तर रस्त्यावरील विक्रेत्यांची पावसाने माल भिजू नये यासाठीही कसरत करावी लागली.गेल्या आठवड्यात शहरसह जिल्ह्यात जोरदार बॅटिंग केलेल्या पावसाने अपवादात्मक परिस्थितीत पाण्याची टंचाई तर दूर केलीच शिवाय राधानगरीसारखे धरण ५० टक्क्याच्या वर भरले. मात्र अवेळीच्या पावसाने भुईमूगसारख्या पिकाचे तर नुकसान केलेचे शिवाय पावसाने कित्येक शेतीही तयार करता आली नाही. त्यामुळे कधी एकदा पाऊस उघडतो आणि शेती तयार करायला मिळेल, अशा अपेक्षेत शेतकरी होते. चार दिवसांपासून पाऊस उघडला त्यामुळे शेती तयार करण्याच्या गडबडीत शेतकरी होता. तोपर्यंत मॉन्सूनचे आगमन झाले. मात्र हा पाऊस रिमझिम होता. त्यामुळे शेती कामाची लगबग सुरू होती. त्यात अचानक बुधवारी चार वाजता धो धो पावसाने सुरवात केली. पाऊस रात्री बराच वेळ सुरू होता. गुरुवारची सकाळ मात्र पावसाळी वातावरणाने उजाडली होती. त्यामुळे आजही सर्वांनी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. पण चक्क उन पडले आणि सर्वांनी निश्वास सोडला होता. पण दुपारी चारनंतर पुन्हा पावसाळी वातावरण होऊन पाचच्या दरम्यान पुन्हा जोरदार पावसाने सुरवात केली. तासभराच्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी केले. यामुळे कित्येकांची तारांबळ उडण्याबरोबरच शहराच्या सखल भागात पाणी साचले. एक तासान पाऊन उघडला आणि पुन्हा पुन्हा मावळतीचे ऊन पडले आणि पुन्हा उकाडा जाणवू लागला.हवामान खात्याच्या अंदाजानुसार ७ ते १० जून या कालावधीत पुन्हा पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## भरधाव कारची मोटार सायकलला धडक; एकाचा मृत्यू

आरंभ मराठी | धाराशिव

भरधाव कारने मोटार सायकलला जोराची धडक दिल्यामुळे मोटार सायकल वरील व्यक्तीचा मृत्यू झाला. हा अपघात धाराशिव शहरातील एमआयडीसी परिसरात झाला.

यासंबधी सविस्तर वृत्त असे की, सचिन विजयकुमार सर्जे (रा. शाहुनगर ता.जि. धाराशिव) हे दिनांक १ जून रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास एनएच ५२ संभाजीनगर ते सोलापूर जाणाऱ्या रोडवर ओवन हॉटेल समोर ब्रीजवर धाराशिव येथुन मोटरसायकलवरून जात होते. दरम्यान मारुती स्वीफट कार (क्र एमएच ०४ एफ. झेड ९८४०) चा चालक आरोपी खंडु रामहारी कोळी (रा. धाराशिव ता.जि. धाराशिव) याने त्याच्या ताब्यातील कार ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून सचिन सर्जे यांच्या मोटरसायकलला पाठीमागून धडक दिली. या अपघातात सचिन सर्जे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. फिर्यादी बालाजी विजयकुमार सर्जे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम २८१,१२५(अ),१२५(ब), १०६(१)कलम १३४(अ)(ब),१८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पूर्वमोसमी पावसाने जिल्ह्यातील २२६ प्रकल्पात १० टक्के पाणी वाढले; उपयुक्त पाणीसाठा २६ टक्के


■ सीना कोळेगाव धरणात २२ टक्के तर तेरणा प्रकल्पात ४३ टक्के पाणी

■ तेरणा प्रकल्पातील पाणीसाठा १५ तर सीना कोळेगाव प्रकल्पातील पाणीसाठा २१ टक्क्यांनी वाढला

आरंभ मराठी | धाराशिव

मागील आठवड्यात धाराशिव जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने घातलेला धुमाकूळ अनेक घटकांवर परिणामकारक करणारा ठरत आहे. यंदा मान्सूनपूर्व पावसाने लावलेली हजेरी अचंबित करणारी आहे. धाराशिव जिल्ह्यात वार्षिक ६०० ते ७०० मिमी पाऊस पडतो. परंतु, मागील आठवड्यात पडलेल्या पावसाची सरासरी ३०० मिमी आहे. म्हणजे वार्षिक सरासरीच्या जवळपास निम्मा पाऊस मे महिन्याच्या दहा दिवसांत पडला आहे. या पावसाने जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या सीना कोळेगाव धरणात २२ टक्के पाणीसाठा वाढला आहे, तर तेरणा मध्यम प्रकल्पात १५ टक्के पाणीसाठा वाढला आहे. तर जिल्ह्यातील उपयुक्त पाणीसाठ्यात १० टक्क्यांची भर पडली आहे.

यंदा मान्सूनचा एकही पाऊस झालेला नाही.परंतु,मान्सूनपूर्व पावसाने मात्र सर्वत्र पाणीच पाणी केले आहे.या पावसामुळे फळबागांचे नुकसान झालेअसले तरी जिल्ह्यातील सर्व प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मात्र मिटला आहे. धाराशिव जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्याची सरासरी ६०० ते ७०० मिलिमीटर इतकी आहे. मात्र दिनांक १८ मे ते ३१ मे या काळात धाराशिव जिल्ह्यात तब्बल ३००मिलिमीटर इतका पाऊस पडला आहे. म्हणजे वार्षिक सरासरीच्या निम्मा पाऊस मान्सून दाखल होण्यापूर्वीच पडला आहे. या पावसाने एकीकडे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तर दुसरीकडे जिल्ह्यातील छोट्या-मोठ्या सर्व जल प्रकल्पात पाण्याचा मोठा संचय झाल्यामुळे जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकट काही प्रमाणात दूर झाले आहे.



### शून्यावर गेलेल्या ७० प्रकल्पात पाणी वाढले

धाराशिव जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम आणि लघु अशा सर्व प्रकल्पाच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. पंधरा दिवसांपूर्वी जिल्ह्यातील ११० प्रकल्पानी तळ गाठला होता. म्हणजे त्यांची पाणीपातळी शून्य टक्क्यांवर गेली होती. सध्या फक्त ४३ प्रकल्पात उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्के आहे. म्हणजेच मागील आठवड्यात शून्यावर गेलेल्या ७० प्रकल्पात सध्याच्या पावसामुळे १५ टक्क्यांपर्यंत पाणी जमा झाले आहे.

### सर्व प्रकल्पात मिळून १० टक्के पाणी वाढले

धाराशिव जिल्ह्यातील १ मोठा, १७ मध्यम आणि २०८ लघु अशा एकूण २२६ प्रकल्पात पंधरा दिवसांपूर्वी १६.६० टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. यामध्ये वाढ होऊन उपयुक्त पाणीसाठा २६ टक्के झाला आहे. म्हणजे सर्व प्रकल्पात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०८ लघु प्रकल्पापैकी ५ प्रकल्प १०० टक्के भरले आहेत. तर २५ प्रकल्पात ५० टक्क्याहून अधिक पाणीसाठा झाला आहे. सध्या पिण्याच्या पाण्याची समस्या मिटली आहे.

### तेरणाप्रकल्प निम्म्यावर तर सीना कोळेगाव प्रकल्पातील पाणीसाठा पाव टक्क्यांवर

मे महिन्यातील पंधरा दिवसांच्या सततच्या पावसाने जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या सीना कोळेगाव प्रकल्पात २२ टक्के पाणीसाठा वाढला आहे. पंधरा दिवसांपूर्वी या धरणातील उपयुक्त पाणीसाठा शून्यावर गेला होता. तो दिनांक २८ मे च्या रिपोर्टनुसार ८ टक्क्यांवर होता. आता मात्र त्यात २२ टक्के पाणीसाठा आहे. तेरणा मध्यम प्रकल्पात देखील पंधरा दिवसात १४ टक्के पाणीसाठा वाढला आहे. पंधरा दिवसांपूर्वी तेरणा मध्यम प्रकल्पात ३० टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. तो सध्या ४४ टक्के इतका झाला आहे.

## लिव्ह इनमधील प्रेयसीचा खून करणाऱ्या युवकाची आत्महत्या

आरंभ मराठी | कोल्हापूर

लग्नाला नकार दिल्याच्या कारणातून लिव्ह इनमधील प्रेयसीचा चाकूने भोसकून खून करून पळून गेलेला सतीश मारुती यादव(रा. शिवाजी पेठ,मूळ रा.पेंद्रेवाडी,उंड्री,ता. ाहूवाडी) याने शाहूवाडी तालुक्यातील माळापुडे-कातळेवाडी परिसरातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार आज सकाळी उघडकीस आला.मंगळवारी(ता. ३) सरनोबतवाडी येथील भाड्याच्या घरात प्रेयसी समीक्षा हिचा खून करून तो पळून गेला होता.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार सतीश यादव आणि समीक्षा भारत नरसिंगे (वय २३, रा. कसबा बावडा) हे दोघे गेल्या चार महिन्यांपासून लिव्ह इनमध्ये सरनोबतवाडी येथे राहात होते.यादव याने लग्नाचा आग्रह धरल्याने दोघांमध्ये वाद सुरू होता.याच वादातून मंगळवारी दुपारी अडीच ते तीनच्या दरम्यान चाकूने भोसकून समीक्षाचा खून केला.हल्ला करून तो समीक्षासह तिच्या मैत्रिणीला घरात कोंडून दुचाकीवरून पळून गेला होता. बाजार भोगावमार्गे तो शाहूवाडी तालुक्यातील नांदारी येथील मित्राकडे गेला. बुधवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास तो मित्राला काही न सांगता निघून गेला.मित्रासह पोलिस त्याचा शोध घेत होते.



दरम्यान,गुरुवारी सकाळी त्याचा मृतदेह शाहूवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत माळापुडे-कातळेवाडी येथील जंगलात झाडाला लटकलेल्या स्थितीत आढळला.त्याने बुधवारी सकाळीच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली. याची नोंद शाहूवाडी पोलिस ठाण्यात झाली.दोन दिवस कसून शोधखून करून पळालेला सतीश यादव याच्या शोधासाठी गांधीनगर पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची पथके कार्यरत होती. यादव याचे गावाकडील घर,सर्व मित्र, नातेवाईक आणि पैपाहुण्यांकडे त्याचा शोध घेतला.जिल्ह्यातील सर्व लॉजचीही तपासणी केली होती. अखेर त्याने आत्महत्या केल्याचे समजताच पोलिसांचा तपास थांबला.

# कविता अद्वैताच भान, सौंदर्याचा गान ,कविता सतीचं वाण

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार.
काव्यारंभचे अठरावे पुष्प सुरभी भोजने (बी. सुरभी ) ज्यांनी आपल्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या जीवनावर बनवलेल्या महामहिम दिदीजी या चित्रपटासाठी गीतकार म्हणून काम केलेल्या प्रतिभावान गझल कारा, लेखिका आणि कवयित्रीच्या कवितांनी गुंफणार आहे. या चित्रपटाला एकूण सहा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्याबरोबर सृष्टी, अपनापन, देव पावला या चित्रपटांच्या पण .त्या गीतकार आहेत.बी. सुरभी यांचे इंग्रजी विषयातुनएम. ए.बी.एड झालेले आहे. त्यांन लातुर, औसा, धाराशिव येथे आठ वर्ष शिक्षिका म्हणून काम केलेले आहे.भावगंधित शब्दालय हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित आहे. तसेच सावित्रीच्या कविता हा प्रतिनिधीक कवितासंग्रह प्रकाशित आहे. साहित्य सौरभ या पाडवा विशेषांकातपण त्यांनी वैचारिक लेखन केलेले आहे.२०२१ चा राज्य स्तरीय हिरकणी पुरस्कार त्यांना प्राप्त झालेला आहे.महामहिम दीदीजी या चित्रपटाला सरोजिनी नायडू आंतरराष्ट्रीय पुरस्कार, दादासाहेब फाळके जन्मभूमी पुरस्कार २०२५ नाशिक, दादासाहेबफाळके पुरस्कार २०२५ मुंबई, अ‍ॅवॉर्ड ऑफ डिस्टिंक्शन इन ७ फिल्म फेस्टिवल नोएडा, सातवा वैश्विक फिल्म पुरस्कार सुरिनामचे राजदूत यांच्याकडून, आयर्लंड फिल्म फेस्टिव्हलमध्ये बेस्ट फिल्म अ‍ॅवॉर्ड इतके पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

अशा ह्या शब्दांवर प्रभुत्व असणारी कवयित्रीच्या कविता व गझल वाचकांना चिंतन, मनन करायला भाग पाडणाऱ्या आहेत त्यांच्या सूर्य आणायला जायचं आहे
कवितेत त्या म्हणतात, जीवनातल्या दुःखाचं खोदकाम करायची इच्छा नाहीमला सूर्य आणायला जायचं आहे, आत्मस्थिरतेचा या ओळींमधून त्या दुःख पुन्हा पुन्हा उगाळत बसण्यापेक्षा आत्मिक समाधानाचा सूर्य मिळवला पाहिजे हा मौलिक संदेश देतात तर कविता म्हणजे काय हे सांगताना

कविता अद्वैताचं भान
कविता सौंदर्याचं गान
कविता सतीचं वाण
कविता सार्थकतेचा प्राण
असं सहज लिहून जातात!

तर ती या कवितेत जननी आणि शक्ती असून जरी फरपटली
सांध त जाते दुवा तरीही युगातली ती
असे स्त्रीचे यथार्थ वर्णन करतात.
आपल्या भावाच्या आठवणीत त्यांनी लिहिलेली गझल
टोचते नसणे तुझे ते काळजाला
पोरकेपण सावलीला फार झाले
आपल्या काळजाला स्पर्श करते तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर लिहिलेली सवितृ ही कविता सावित्रीबाईंची महानता प्रभावीपणे मांडते.
अशा या भावप्रधान कवितांचा आपण रसास्वादघेऊया.



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

## सवितृ..

वाटला प्रकाश तू ,जाहली
दिव्यात वात
काढलीस वाट ती, जीवना

दिलीस साथ
मशाल होऊनी पुढे, अक्षरांस
पूजिले
ज्ञानमाय होऊनी ,समत्व तूच
निर्मिले
झेलुनी तमास त्या , गात्री
स्फुरण बांधिले
अक्षरास गिरवुणी ,प्रकाश बीज
पोसले
दुर्बलास बनविले, सबल तेज
धारिणी
नाहली वसुंधरा, ज्ञानशील
चारिणी
सवितृ सूर्य कार्य ते ,शोभले
तुला किती
वंदितात माऊली ,तनया तव
सन्मती...

## तुझ्यावीण..

फुलदाणीतील अत्तर पार झाले
तुझ्यावीण अस्तित्व राखणदार
झाले .टोचते नसणे तुझे जे
काळजाला
पोरकेपण सावलीला फार
झाले ...
तू उन्हाची पावले मांडून गेला
सभ्यतेच्या आठवांचे भार
झाले ..
आजही भाषा मनांची जोडतो
तू जरी का अंतर युगांची धार
झाल..
असशी जिथे तू दिव्य आणि
भव्य व्हावे
मागणे विश्वंभरा साकार
व्हावे....

## ती...

क्षणाक्षणांनी अस्तित्वाला विहंग
करते
विचार ठेवत असते हृदयी
नभातला ती...!!

ओझ्यातुन तेजात उजळते
तिची रक्तिमा
सूर्योदय पहात असते आतून
तिच्यातला ती ..
जननी आणि शक्ती असुनी
जरी फरफटली
सांधत जाते दुवा तरीही
युगातला ती ...
दिवा वात अन तेलाशीही
साम्य साधते
प्रकाश तेवत असते आपुल्या
मनातला ती ...

तिच्यात वाटे दिव्यत्वाचे रोप
नांदते
सुगंध आहे दरवळणाऱ्या
बीसुरभी...फ्रीसुरभी...
फुलातला ती....!!

## सूर्य आणायला जायचं आहे.....!!

जीवनातल्या दुःखाचं
खोदकाम करण्याची इच्छा
नाही...
मला सूर्य आणायला जायचं
आहे.....
आत्मस्थिरतेचा .....!!!!
प्रकाश देणाऱ्या
विहंगम मनाच्या आभाळात....
'' ते आभाळ'' जे ...
खरोखर माझ्या हक्काचं आहे
.आणि ती शांतता...
जी मनापासून ...
माझी वाट पाहत असते
...कारण हे सत्य आहे ...
युगानुयुगे आमचं ,एकम
`कांवर प्रेम आहे
आणि आम्ही ....
एकमेकांसाठीच आहोत....

## कविता....

वेदनेच्या आभाळात झालेला
सौंदर्याचा उदय कविता
भेगाळलेलं जोडत जाणारी
आसमंताचं हृदय कविता.....

कविता प्रीतीची साक्ष
कविता आत्म्याचा मोक्ष
कविता विराटचा ध्यास
कविता सुगंधाचा श्वास ...

कविता पहाटेची रुणझुण
कविता ब्रह्मराची गुणगुण
कविता काळाकुट्ट मेघ
कविता दामिनीची रेघ...

कविता आभाळाचं नसणं
कविता निसर्गाचा हसणं
कविता व्याकुळतेचा अंत
कविता स्वतः ठिकाणी अनंत...
कविता काळीज झंकार
कविता प्रेमातला होकार
कविता सखीच हसू
कविता डोळ्यातला आसू ...

कविता पावसातलं भिजनं
कविता अहंकाराचं विझनं
कविता परमात्म आधार
कविता निरामय आकार ...!!

कविता अद्वैताच भान
सौंदर्याचा गान
कविता सतीचं वाण
कविता सार्थकतेचा प्राण.....!!

कविता राधाकृष्ण
कविता कर्ण भीष्म
कविता द्रौपदीचा बंधू
कविता सरीता कविता सिंधू....





सुरभी भोजने-वाडक
धाराशिव

# कृष्णेच्या पुराचे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी १०० किलोमीटरचा बोगदा

■ देवेंद्र फडणवीसांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प,
■आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती



आरंभ मराठी | धाराशिव

पावसाळ्यात समुद्रात वाहून जाणारे कृष्णेचे ४० टीएमसी पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यात आणण्यासाठी महत्वाकांक्षी प्रकल्प आखण्यात येत आहे. दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रातून वाहून जाणारे हे पाणी १०० किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्याचा प्रस्ताव असून, त्यानंतर हे ४० टीएमसी पाणी बीड, धाराशिव, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागांमध्ये वितरित केले जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य देऊ केले असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पुरस्थितींवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी आणि मराठवाड्यातील दुष्काळी भागांना जलसंपत्ती उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाअंतर्गत, कृष्णा खोऱ्यातील पूरस्थितीतून दरवर्षी वाहून जाणारे अंदाजे ४० टीएमसी पाणी १०० किलोमीटर लांबीच्या बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या साहाय्याने उजनी धरणात वळविण्याचा प्रस्ताव आहे. २०१९ साली कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये आलेल्या भीषण पुरानंतर, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे पुराचे पाणी समुद्रात न जाऊ देता, त्याचा उपयोग दुष्काळग्रस्त भागांच्या सिंचनासाठी करणे आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी मित्र संस्थेच्या 'कृष्णा पुरनियंत्रण प्रकल्प ' अंतर्गत करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यासाठी राज्य शासनाकडून ९६३ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या टप्प्यात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, आणि जलवाहिनी प्रणाली सुधारण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. तर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, पुराचे पाणी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये वळविण्याची योजना आहे.

### अंमलबजावणीसाठी बैठक

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे (MITRA) उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'कृष्णा पूर नियंत्रण प्रकल्प' बाबत महत्वाची बैठक पुणे येथील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ कार्यालयात पार पडली. बैठकीत सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पुरपरिस्थितीवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी हे अधिकचे पाणी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागाला देण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. जागतिक बँकेचे तांत्रिक सल्लागार या प्रकल्पाचा'प्रकल्प व्यवहार्यता अहवाल'(Feasibility Report ) पुढील तीन महिन्याच्या आत सादर करणार असल्याचेही आमदार पाटील यांनी म्हटले आहे. यावेळी कृष्णा खोरे महामंडळचे कार्यकारी संचालक अतुल कपोले,सचिव व्हि.एम. कुलकर्णी, मुख्य अभियंता गुणाले,मुख्य अभियंता धुमाळ,उपसचिव सविता बोधेकर,अधीक्षक अभियंता शिल्पा जाधव (पाणी तंटा लवाद पुणे )अधीक्षक अभियंता कोल्हापूर अभिजीत म्हेत्रे,कृष्णा मराठवाडा प्रकल्प अधीक्षक अभियंता थोरात,कार्यकारी अभियंता नाईक उपस्थित होते.

# पर्यावरण दिनानिमित्त नळदुर्ग येथे वृक्षारोपण

आरंभ मराठी | नळदुर्ग



५ जून हा पर्यावरण दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. त्यानिमित्ताने नळदुर्ग येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे चालू असलेल्या दहा दिवसीय निवड श्रेणी प्रशिक्षणाच्या निमित्ताने एकत्रित आलेल्या संत गाडगेबाबा ग्रुपच्या वतीने प्रशालेच्या मैदानावर २ कोनो कॉर्पस जातीची भरपूर सावली देणारी झाडे लावण्यात आली. परिपाठानंतर या झाडांचे वृक्षारोपण उपस्थित मान्यवर व सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रणजीत चव्हाण, संत गाडगेबाबा ग्रुप सदस्य विक्रम पाचंगे, राम माने, परमेश्वर शिंदे, अमोल बिराजदार, दयानंद पाटील, धनराज कुडकुले, वेंकट कोळी, रमेश भुरे, एम एम पाटील, विस्तार अधिकारी तथा केंद्र संचालक एन.बी जेट्टे, ए वाय करदुरे, मुकेश उपासे, श्रीकृष्ण रंगदळ यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलला राष्ट्रीय आदर्श शाळा पुरस्कार

आरंभ मराठी| उमरगा



उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलला आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था राळेगणसिद्धी यांच्याकडून दिला जाणारा मानाचा राष्ट्रीय आदर्श शाळा पुरस्कार २०२५ मिळाला. हा पुरस्कार ३ जून रोजी राळेगणसिद्धी येथे समाजसेवक अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष पर्यावरण मित्र देवा तांबे, चन्ना शरद बाबू अध्यक्ष बार असोसिएशन सुप्रीम कोर्ट विशाखापटनम, संतोष गायके पोलीस अधीक्षक गोरेगाव मुंबई, विठ्ठलराव जाधव माझी पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे विस्तार अधिकारी संतोष माळी क्रीडा शिक्षक महंमदरफी शेख, राम साळुंके यांनी स्वीकारला. गेल्या पाच वर्षात शाळेने गुणवत्ता, पायाभूत सुविधा, पर्यावरण, मुलींचे शिक्षण, शाळेच्या भौतिक गरजा विविध नाविन्यपूर्ण राबविलेले उपक्रम, लोकवाटा, मियावाकी जंगल निर्मितीतून पर्यावरणाचे केलेले संरक्षण, विविध स्पर्धा परीक्षेतील शाळेचे यश, लाठीकाठी दांडपट्टा कराटे यासारख्या देशी खेळातून मुलींना स्वसंरक्षणासाठी शाळेने केलेले उत्तम कार्य,आदि शैक्षणिक उपक्रम राबवून शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सतत दोन वर्ष आठ लाखाचे मिळवलेले पारितोषिक आहे. लिटल प्लॅनेट फाउंडेशन व ऊर्जा कडून महाराष्ट्र व गोवा राज्यातील १० उत्कृष्ट शाळेत मिळविलेले स्थान व शाळेला मिळालेले पन्नास हजाराचे पारितोषिक या गोष्टींमुळे शाळेला राष्ट्रीय आदर्श शाळा पुरस्कार मिळालेला आहे. शाळेला मिळालेल्या पुरस्काराबद्दल उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, धाराशिव जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्रप्रमुख शीला मुदगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे, अमर वरवटे, सुजाता मोरे व शाळेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. शाळेला मिळालेल्या पारितोषकामुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कोल्हापुरात सोन्याचा भाव पुन्हा लाखावर

आरंभ मराठी | कोल्हापूर

गरिबापासून श्रीमंतांपर्यंत सर्वांच्या जिव्हाळ्याचा आणि हौसेचा विषय असणाऱ्या सोन्याच्या दराने आज पुन्हा लाखाच्या वर उडी मारली. त्यामुळे बाजारात मात्र ग्राहकांची वर्दळ फारशी जाणवली नाही. घरी सणकार्य असो वा विशेष दिन प्रत्येकाला गुंजभर सोने घेण्याचा मोह काही आवरत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस सोन्याच्या दरात वाढ तर होत आहेच शिवाय सुरक्षित गुंतवणूक म्हणूनही सोन्याची खरेदी होत आहेत. दिवसेंदिवस वाढणारा सोन्याचा दर बुधवारी दहा ग्रॅम साठी ९८,५०० असा होता, तर आज तो एक लाख एक हजार रुपयांवर पोहचला. याआधी गुढी पाडव्यानंतर दरात वाढ होत होत अक्षय्य तृतीयेला तो एक लाखाच्या वर गेला होता. त्यानंतर तो पुन्हा लाखाच्या आत वर-खाली असा होत राहिला पण पुन्हा आज वाढ होऊन तो एक लाख एक हजार रुपये दहा ग्रॅम असा झाला. यामुळे गुजरी बाजारात ग्राहकांची वर्दळ तशी फारशी आढळली नाही. जागतिक घडामोडी, स्थानिक बाजारात असणारी वाढती मागणी, एक सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय व गरीब-श्रीमंतांना असणारा सोन्याचा मोह यामुळे सोन्याच्या दराने पुन्हा एकदा उच्चांक गाठला.



### आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धाचा परिणाम

अमेरिकन टेरिफ आणि चायना टेरिफ वॉर या घटकांमुळे सोन्याच्या दरात वाढच होत आहे. यावर मार्ग निघत नाही तोपर्यंत दर वाढतच राहतील.

राजेश राठोड,
अध्यक्ष, कोल्हापूर सराफ व्यापारी संघ

### दर कमी होण्याची शक्यता कमी

गुजरीसह स्थानिक बाजारपेठेत सोन्याचा प्रतितोळा दर एक लाख एक हजार होता, तर चांदी एक किलोसाठी एक लाख नऊ हजार रुपये असा होता. वर्षभरातील सोन्याचे वाढते दर तसेच जगभरातील घडामोडींमुळे सोने दर जिल्ह्यात दहा ग्रॅमसाठी एक लाख एक हजार रुपये मोजावे लागले. सध्याच्या स्थितीत लग्नाचा हंगाम संपत आला असला तरी सोने दर फारसे खाली येण्याची शक्यता नाही.

– भरत ओसवाल,
अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा सराफ संघ,

# नियमांचे पालन करून बकरी ईद साजरी करण्याचे नळदुर्ग मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन

आरंभ मराठी | नळदुर्ग



महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायदा १९९५ नुसार संपूर्ण राज्यात गोवंश हत्या बंदी लागू आहे. त्यामुळे सर्वांनी बकरी ईद साजरी करताना प्रशासनाने केलेल्या सूचनेचे पालन करावे असे आवाहन नळदुर्ग नगरपरिषद चे प्रभारी मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी केले आहे. त्याचबरोबर असे देखील आवाहन केले आहे की, ७ जून ते ९ जून दरम्यान मुस्लिम बांधव बकरी ईद साजरी करणार आहेत. त्याकरिता नगरपरिषद कडून कुरेशी गल्ली येथे तात्पुरत्या स्वरूपाचा कत्तलखाना उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर ठिकाण वगळता शहरात इतर ठिकाणी कुर्बानी देण्यात येऊ नये. राज्यात गोवंश हत्या बंदी लागू असल्याने त्याचे काटेकोरपणे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक राहील असेही आवाहन त्यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# पिंपरीच्या शाळेचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच शाळेला लागली गळती

## दोन वर्षापासून शाळेच्या ईमारतीचे काम संथ गतीने

### नवीन शैक्षणिक वर्षही गळक्या शाळेतच सुरू होणार

अमोलसिंह चंदेल | आरंभ मराठी

शिराढोण –कळंब तालूक्यातील पिंपरी (शि) येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेच्या नवीन ईमारतीचे काम मागील दोन वर्षापेक्षा जास्त कालावाधी पासून चालू आहे. एकूण ६ वर्गखोल्यांचे काम अपूर्णच असल्याने येथील विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. उन्हाळी सुट्टी नंतर आता १५ जुनला शाळा सुरु होणार आहे. परंतु येथील विद्यार्थ्यांना पुन्हा ईमारतीमूळे ज्ञानार्जण करताना अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

नवीन ईमारत पुर्ण होण्यापूर्वीच सदरील ईमारतीच्या छताला गळती लागल्याने पालकांतून संताप व्यक्त होत आहे.त्यामूळे येथील शाळेच्या नविन ईमारतीचे काम तात्काळ सुरु करुन ते दर्जे दारपणे करावे अशी मागणी ग्रामस्थ तसेच पालकांतून होत आहे.कळंब तालूक्यातील पिंपरी (शि.)येथे जिल्हा परीषदेची इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतची शाळा आहे. या शाळेची जुनी ईमारत अतिशय जीर्ण झाल्याने शासकीय पातळीवरुन येथे एकूण ६ वर्ग खोल्यां नव्याने मंजूर करण्यात आल्या आहेत. गावातील नागरिकांनी या कामी ५ लाख ५० हजारांचा लोक सहभाग जमा केला. तसेच शासकिय निधी ५५ लाख रुपये या ईमारतीसाठी मंजूर झाला. टेंडर प्रक्रीया तसेच सर्व बाबी पुर्ण करुन ठेकेदाराच्या माध्यमातून दोन वर्षापुर्वी या नविन वर्गखोल्यांचे काम सूरु झाले. परंतू सदरील काम हे निकृष्ट व अतिशय संथ गतीने चालत असल्याने पालकांतून संताप व्यक्त होत आहे. येथील जिल्हा परीषद प्राथमिकशाळेची गुणवत्ता अतिशय चांगली आहे.ईमारत व पायाभूत सुवीधांसाठी निधीही भरघोस परंतू या सर्व कामांवर वरीष्ठांचे दुर्लक्ष का?असा सवाल उपस्थित होत आहे.तीन वर्षापासून हे काम अतिशय संथ गतीने होत असून आजही या नविन ईमारतीचे प्लास्टर,खीडक्या,दरवाजे असे काम अपूर्ण अवस्थेतच आहे.या ईमारतीच्या कामावर वरीष्ठांनी लक्ष घालून संबंधीत ठेकेदारास या बाबत विचारणा करुन योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.





### सर्वच नवीन खोल्यांना गळती

संथ गतीने चालणाऱ्या या शाळेच्या वर्गखोल्या गळत आहेत. शाळेचे काम पुर्ण होण्या आगोदर छताला गळती लागल्याचे चित्र सध्या येथे पहावयास मिळत आहे. विद्यार्थ्यांनी या नविण वर्ग खोल्यात जाण्या आगोदरच जर ईमारतीची अशी अवस्था असेल तर पुढे काय होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.



### चिमूकल्या विद्यार्थ्यांच्या अपेक्षेची होतेय उपेक्षा

पिंपरी शि. येथील शाळेतील चिमूकले विद्यार्थी या होत असलेल्या नविण ईमारतीत शिक्षण घेण्यासाठी उत्सूक आहेत. मात्र त्यांच्या या अपेक्षेची उपेक्षा होताना दिसून येत आहे. हे काम कधी पुर्ण होणार व या ग्रामीण विद्यार्थ्यांना नविण ईमारतीत दर्जेदार शिक्षण कधी मिळणार हा प्रश्न मात्र अनूत्तरीत आहे. या कामावर कोणाचेही लक्ष नसल्याने हे काम प्रलंबीत आहे. त्यामूळे या शाळेच्या बांधकामाकडे ग्रामस्थांनीही एकजुटीने लक्ष घालून ग्रामीण विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड थांबवण्याची गरज निर्माण झाली आहे.

### काम पूर्ण झाल्याशिवाय शाळा भरू देणार नाही

पिंपरी शि. येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेच्या नविण वर्गखोल्यांच्या बांधकामत ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत त्या पुर्ण करुन सदरील नविण बांधकामाचे अपूर्ण राहिलेले सर्व काम पुर्ण झाल्या शिवाय आम्ही सर्व पालक या वर्षी शाळा भरु देणार नाहीत. त्यामूळे वरीष्ठांनी या कामावर प्रत्यक्ष येवून पहाणी करुन संबंधीत ठेकेदारास योग्य त्या सूचना देवून हे काम तात्काळ पुर्ण करुन घ्यावे.

– राजकुमार माळी, नागरिक, पिंपरी शि.

# गाडी लावण्यावरून एकाला कोयत्याने मारहाण

आरंभ मराठी | धाराशिव

गाडी लावण्याच्या किरकोळ कारणावरून वाद होऊन कोयत्याने मारहाण केल्याची घटना धाराशिव शहरात घडली.आरोपी मकसुद शेख(रा.विकास नगर,धाराशिव) याने दिनांक २ जून रोजी विकास नगर पाकले हॉस्पीटल समोर,धाराशिव येथे फिर्यादी किशोर मारुती कोळगे(वय ३३ वर्षे,रा.तुळजापूर नाका पापनाश नगर हनुमान चौक धाराशिव) यांना रस्त्यावर गाडी लावण्याच्या कारणावरुन शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी,कोयत्याने मारहाण करुन जखमी केले. किशोर कोळगे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ११८(१),११५(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण




आरंभ मराठी| उमरगा

उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा ग्रीन क्लब हरित सेना यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा करताना वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनासाठी संरक्षक जाळी उपक्रमाची सुरुवात महाविद्यालय परिसरात करण्यात आली. दरवर्षी महाविद्यालयात एक शिक्षक एक वृक्ष आणि एक विद्यार्थी एक वृक्ष या अभियानांतर्गत दत्तक वृक्ष योजना सुरू आहे. चालू शैक्षणिक वर्षाची २०२५–२६ सुरुवात पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाने करण्यात आली. यावेळी बोलताना प्राचार्य अस्वले यांनी वृक्षारोपण हे आजच्या पर्यावरणीय समस्यांवर उपाय देणारे प्रभावी साधन आहे, पण त्याचे खरे मूल्य तेव्हा समजते जेव्हा आपण त्याचे संवर्धन करतो. पर्यावरण वाचवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज असे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले, डॉ. बी. के. लबडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बी.ए. शेळके, डॉ. दामू बिराजदार, डॉ. ए. एस. पदमपल्ले, डॉ. डी. बी. ढोबळे, प्रा. काकनाळे, डॉ. पी. डी. पाटील, अनिल तुंगे, भालेराव, एस. एस. जगताप, धनु पाटील या हरित सेना आणि ग्रीन क्लब सदस्यांची उपस्थिती होती.

# सैनिक कल्याण कार्यालयात संगणक ऑपरेटरच्या दोन जागांसाठी एक महिन्यांची रोजगार संधी

आरंभ मराठी | धाराशिव



जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धाराशिव येथे महाडीबीटी डाटा अद्ययावत करण्यासाठी एक महिन्याच्या कालावधीसाठी संगणक ऑपरेटरच्या दोन जागा तात्पुरत्या भरावयाच्या आहेत. या पदांसाठी जिल्हा सैनिक कार्यालयाच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या माजी सैनिक व विधवा यांना प्राधान्य दिले जाणार आहे. संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास माजी सैनिकांचे पाल्य तसेच नागरी संवर्गातील पात्र उमेदवारांनाही संधी दिली जाईल.पदासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ९ जून २०२५ असून, इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सैनिक सेवेचे तसेच शैक्षणिक कागदपत्रांसह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे सादर करावेत.निवड प्रक्रियेअंतर्गत मुलाखत दि.११ जून २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत घेतली जाईल. उमेदवाराकडे संगणकावर डाटा फीडिंगचे आवश्यक ज्ञान असणे अपेक्षित आहे.अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४७२२२२५५७ किंवा भ्रमणध्वनी क्रमांक ७५८८५२७५५४ वर संपर्क साधावा.या संधीचा लाभ जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिक, त्यांच्या पाल्यांनी तसेच नागरी उमेदवारांनी घ्यावा,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त उमरगा येथे वृक्षारोपण

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा येथे गुरुवारी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सहाय्यक दुय्यम निबंधक मंडलिक यांच्या हस्ते व राज्य उत्पादन शुल्क कार्यालय तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व सावकाराचे सहाय्यक निबंधक या कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यालय प्रमुख माळी सर यांच्या हस्ते वृक्ष लागवड केली. यावेळी ए जी चौगुले वनरक्षक उमरगा, एम बी कोकाटे वनरक्षक मुळज, पी एन थोरात आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. वृक्षारोपण करून मान्यवरांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. कार्यक्रमाचे नियोजन वन विभाग यांनी केले होते.



# श्री जोतिबा देवस्थान विकास आराखडा अंमलबजावणीसाठी शासन पूर्णपणे पाठीशी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

आरंभ मराठी | कोल्हापूर



महाराष्ट्राचे कुलदैवत दख्खनचा राजा श्री जोतिबा मंदिर विकास आराखड्याची सुरुवात वृक्षारोपणाने होत असून, विकास आराखडा अंमलबजावणीसाठी शासन पूर्णपणे पाठीशी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यांच्या हस्ते झालेल्या ऑनलाइन उद्घाटन सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते. कोल्हापूर जिल्ह्यातील वाडी रत्नागिरी येथे राष्ट्रीय महामार्ग आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून 'दख्खन केदारण्य' वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री कोल्हापूर प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ ऑनलाइन तर कार्यक्रमस्थळी खासदार धैर्यशील माने, आमदार डॉ .विनय कोरे, आमदार अशोकराव माने यांच्यासह जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलिसप्रमुख योगेशकुमार गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग श्री. कदम, प्रांताधिकारी समीर शिंगटे व वाडी रत्नागिरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, वाडी रत्नागिरी डोंगर परिसरातील तीस एकर क्षेत्रामध्ये केदार विजय ग्रंथात नोंद असलेल्या दहा हजार वेगवेगळ्या भारतीय झाडांची लागवड करून दुर्मिळ 'दख्खन केदारण्य' साकारत आहे. आपल्या इतिहासामध्ये, संस्कृतीमध्ये आणि आपल्या आस्थांमध्ये निसर्गाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. आपले सर्व देवदेवता निसर्गाशी साधर्म राखणारे आणि निसर्गाचे संवर्धन करणारे आहेत. निसर्गाची सेवा केल्याशिवाय आपला नमस्कार कोणत्याच देवतांपर्यंत पोहोचत नाही.आमदार डॉ. विनय कोरे यांनी चांगल्या प्रकारे मंदिर व परिसर विकास आराखडा तयार करून घेतला असून २५९ कोटी रुपयांच्या कामाला नुकतीच राज्यस्तरीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामध्ये प्रमुख उद्देश हा जोतिबा डोंगर हिरवागार करणे आहे. या आराखड्याची अंमलबजावणी करीत असताना आवश्यक निधी नियोजन विभागाकडूनच मिळावा अशी मागणी आली आहे आणि ती येत्या काळात पूर्ण करू अशी ग्वाही त्यांनी दिली. आमदार कोरे यांनी केलेल्या दुसऱ्या मागणीप्रमाणे या विकास आराखड्याची अंमलबजावणी प्राधिकरणामार्फतच होण्यासाठी लवकरच प्राधिकरण स्थापनेसही मंजुरी देऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी ऑनलाइन बोलताना दिली.ते म्हणाले, श्रीक्षेत्र ज्योतिबा डोंगरावर अनेक भाविक येतात त्यांची चांगली सोय व्हावी तसेच येथील वातावरणही उल्हासित रहावे या दृष्टीनेच विकास आराखड्याची चांगली अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न शासनाचा आहे. पन्हाळगडावरील झालेल्या चांगल्या कामाप्रमाणेच याही विकासाराखड्यातून आमदार कोरे तसेच स्थानिक सर्व लोकप्रतिनिधी चांगले काम करतील आणि यासोबत निश्चितच शासन पूर्णपणे पाठीशी राहील असे ते म्हणाले.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी वृक्षारोपण कार्यक्रमास शुभेच्छा देऊन समाज जीवन सुरळीत चालण्यासाठी इथिक्स, इकॉनॉमिक्स, इकॉलॉजी आणि एनवोर्मेन्ट या तीन गोष्टी महत्त्वाच्या असल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २०७० सालापर्यंत भारत देश कार्बन न्यूट्रल देश करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपले पर्यावरणपूरक कार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# सहाय्यक निबंधकांची कळंब बाजार समितीला भेट



आरंभ मराठी | कळंब

कळंबच्या बाजार समितीला सहाय्यक निबंधक यांनी भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. कळंबच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील विविध रस्ते हे बाजार समिती स्थापनेपासून व्यवस्थित नव्हते. त्यामुळे बाजार समितीच्या उत्पन्नावर परिणाम झाला होता. मागील दोन वर्षापासून कार्यरत झालेल्या संचालक मंडळाने बाजार समतीच्या हिताचे निर्णय घेण्याचा ध्यास घेतला असून, बाजार समितीचे सभापती शविाजी कापसे व उपसभापती श्रीधर भवर यांनी प्रथम बाजार समतीच्या पायाभूत सुवधिांवर भर दिला आहे. बाजार आवारातील रस्ते सुधारण्या करीता ठराव पारीत करून वरीष्ठ कार्यालयाच्या सर्व परवानग्या घेवून बाजार समिती स्थापनेपासून पहिल्यांदाच ३.५ कोटी रू.ची वकिास कामे, रस्ते बांधकाम व पावसाळी गटार बांधकाम करण्याचे कामकाज चालू आहेत. मा.न्यायालयीन लढाई लढून संचालक मंडळाने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या या रस्त्यांच्या कामांची स्थगिती उठवली आहे. निविदेतील सर्व बाबी योग्य रितीने चालू आहेत का हे पाहण्यासाठी बाजार समितीतील चालू असलेल्या या विकास कामांना दिनांक ३ जून रोजी द सहाय्यक निबंधक बालाजी सावतर यांनी अचानक भेट देवून चालू असलेल्या विकास कामाची पाहणी केली. त्यांनी चालू असलेल्या बांधकामाच्या कामकाजा बाबत समाधान व्यक्त केले. बाजार समतिीला उपबाजार पेठेत गाळे उभारणी करीता आवश्यक असणारी परवानगी ही मिळाल्या बाबत त्यांनी सुचविले. बाजार समितीचे कामकाज हे कायद्यानुसार होत असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे व सर्व संचालक मंडळाचे कामकाज समाधान कारक असल्यबाबतही मत त्यांनी व्यक्त केले. पाहणी करण्यासाठी अचानक भेट दिल्या बाबत सभापती यांनी सावतर यांचा यथोचीत सत्कार केला.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव....

शुक्रवार दि.6 जून 2025

# मलकापूर गावातील जलजीवन मिशन योजनेचे काम दीड वर्षांपासून बारगळले

## ग्रामपंचायत कार्यालयाच्या उदासीनतेमुळे गाव तहानले

### काम पूर्ण न करताच कामाची बिले काढल्याचा ग्रामस्थांचा आरोप

आरंभ मराठी | येरमाळा

कळंब तालुक्यातील मलकापुर येथील ग्रामस्थांना जलजीवन मिशन योजनेअंतर्गत जे नळाव्दारे पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणार होते त्याची आणखी किती दिवस प्रतिक्षा करावी लागणार ? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. देशाच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला घरी स्वच्छ आणि पुरेसे पाणी स्वतंत्र नळाव्दारे २०२४ पर्यंत पोहोचविण्यासाठी ''हर घर जल, हर घर नल '' या पंतप्रधानांच्या महत्वकांक्षेतून जलजीवन योजनेची सुरुवात करण्यात आली. त्यानुसार सुरू केलेल्या या मिशन अंतर्गत प्रत्येक नागरिकाच्या घराला बंद नळातून स्वच्छ व शुद्ध पाणी देण्याचा हेतु आहे. परंतु, गेल्या तीन वर्षांपासून या योजनेची कामे बारगळली आहेत. त्यामुळे पाणी नेमके कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून जलजीवन मिशनच्या माध्यमातून वाड्या वस्त्यावरील घरापर्यंत नळाव्दारे प्रत्येकी ५५ लिटर प्रमाणे पाणी देण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. मात्र मलकापुर येथील नागरिकांच्या पदरी निराशाच पडली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पाईपलाईन करण्यासाठी खोदण्यात आलेले गावांतर्गत रस्ते त्याच अवस्थेत आहेत. या रस्त्यावरून ये जा करण्यासाठी लहान मुलांना व वृद्धांना त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर जर कांही अपघात घडला तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या योजने अंतर्गत नळाला पाणी तर आले नाहीच, परंतु पावसाळा तोंडावर आला असल्याने रस्ते चिखलमय होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भिक नको पण कुत्रा आवर असे म्हणण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या योजनेचे काम रखडलेले आहे. पाणीपुरवठ्यासाठी बांधलेली पाण्याची टाकी म्हणजे मलकापूरची शोभेची वस्तू म्हणूनच उभी आहे असे दिसते. ग्रामस्थांच्या या सर्व अडचणींकडे ग्रामपंचायत प्रशासन मुग गिळून गप्प का आहे ? ग्रामस्थांना पाणी पुरवठा करण्यासाठी केंव्हा लक्ष घालणार ? ठेकेदारास जाब विचारणार का ? असे अनेक प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.



### संबंधित अधिकारी आणि गुत्तेदार यांच्यावर कारवाई व्हावी

गावातील जल जीवन योजनेमुळे अत्यंत उत्तम दर्जाचे सिमेंटचे रस्ते खोदून पाईपलाईन केली आणि आता त्या रस्त्यावरून माणसालाच काय जनावराला देखील चालता येत नाही. याकडे ग्रामपंचायत किंवा प्रशासकीय अधिकाऱ्याचं लक्ष नाही. अनेक जण चिखलात घसरून रस्त्यावर पडले आहेत. परंतु प्रशासन याची कसलीही काळजी घेत नाही. तरी संबंधित प्रशासकीय अधिकारी व गुत्तेदार यांची चौकशी होऊन त्यांच्यावर दंड करून गुन्हे दाखल करण्यात यावे.

–सुंदर लोमटे – नागरीक



### काम पूर्ण न करताच बिले उचलली

सदर योजनेचे काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत संपून दीड वर्ष झाले आहे. तरीसुद्धा योजना कार्यान्वित झाली नाही. ग्रामपंचायतच्या मालमत्तेचे अतोनात नुकसान संबंधित कंत्राटदारांकडून झाले आहे. त्याची देखील दुरुस्ती कंत्राटदारांकडून करण्यात आली नाही. चालू कामाची बीले मात्र उचलण्यात आली आहेत. काम लवकर पूर्ण करण्यासाठी जि.प. पाणीपुरवठा विभाग आणि संबंधित कंत्राटदार यांना ग्रामपंचायत कार्यालय मार्फत पत्रव्यवहार करण्यात आला होता. परंतु, त्याला दोघांकडूनही काहीच उत्तर मिळाले नाही.

–आदित्य लोमटे, ग्रामपंचायत सदस्य

### रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी नोटीस काढणार

मी नवनियुक्त ग्रामसेवक असुन आम्ही संबंधीत ठेकेदारास रखडलेले काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाकडून नोटीस बजावणार आहोत. तसा ठराव मासिक बैठकीत घेण्यात आला आहे.

–विशाल कदम,ग्रामसेवक, मलकापूर.

# युवा नेते विठ्ठल बुरटूकणे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा




आरंभ मराठी | लोहारा

धानुरी नगरीचे उपसरपंच तथा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक विठ्ठल बुरटुकणे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजउपयोगी कार्यकम घेण्यात आले. या वेळी गरजू रुग्णांना फळे वाटप, पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी धानुरी, खेड, माकणी, हराळी या गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी हराळी चे माजी सरपंच रवींद्र पाटील, राम पाटील खेड, धानुरी सरपंच प्रविण थोरात, महादेव धारुळे, दिपक कदम, पांडुरंग सुरवसे, संजय नाना जाधव, प्रकाश रसाळ, सचिन कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाजपचे जिल्हाध्यक्ष पक्षाचे की कुटुंबाचे प्रवक्ते

### शिवसेना (उबाठा) शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांचा सवाल

आरंभ मराठी | धाराशिव

ड्रग्जप्रकरणी निपक्ष चौकशी व्हावी यासाठी खासदार व आमदार प्रयत्न करत आहेत. त्यासाठी ते मुख्यमंत्री यांना भेटणार म्हणल्यावर भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांना नेमक्या कसल्या मिरच्या झोंबल्या असा सवाल शिवसेना ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी केला. भाजपच्या जिल्हाध्यक्षांना पक्षापेक्षा एक कुटुंब महत्वाचे वाटू लागले आहे का?असा प्रश्न गुरव यांनी दत्ताभाऊ कुलकर्णी यांना प्रसिद्धी पत्रकातून केला. खासदार आणि आमदार यांनी पत्रकार परिषदेत पक्षीय टीका केलेली नाही.सारखा सामाजिक विषय घेऊन त्याचा तपास योग्य व्हावा या अपेक्षा लोकप्रतिनिधी म्हणून खासदार व आमदार यांनी मांडल्या.त्यात विकासाचे गोंडस नाव पुढे करून विषयांतर करण्याची गरज नव्हती. जिल्हाध्यक्ष हे पक्षाची भूमिका मांडण्यासाठी असतात,कोणाची तरी वकिली करून चुकीच्या प्रकरणाचे समर्थन करण्यासाठी नसतात असेही गुरव म्हणाले.ड्रग्ज प्रकरणात ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

# मुरुममध्ये भाजपच्या वतीने पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

### रोपे वाढतील प्रदूषके काढतील या संकल्पनेतून पर्यावरण रक्षणाचा संदेश

आरंभ मराठी | मुरुम

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने गुरुवारी (ता. ५) रोजी मुरुम शहरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ''रोपे वाढतील, प्रदूषके काढतील'' या प्रेरणादायी संदेशातून पर्यावरण संरक्षणाचा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला. जागतिक स्तरावर १०० हून अधिक देशांमध्ये पर्यावरण दिन साजरा केला जातो, त्यामागचा उद्देश म्हणजे जनतेमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि बदलत्या हवामानाचा सामना करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे हा आहे. २००९ सालची जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना 'बदलते हवामान व कार्बनचे वाढते प्रमाण' या विषयावर आधारित होती. याच दिशेने सकारात्मक पावले उचलत, मुरुम शहरात भाजप पदाधिकाऱ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश दिला. या उपक्रमात भाजप व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिनियार, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष सिध्दलिंग हिरेमठ, युवा मोर्चा जिल्हा सचिव आकाश क्षीरसागर, भाजप उपाध्यक्ष सुनिल नीलवडे, युवा मोर्चा उपाध्यक्ष विशाल व्हनाळे, बाबुराव बेगमपुरे, उपाध्यक्ष मनिष ब्याळे यांच्यासह अनेक



पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून ''एक वृक्ष – श्वासाचे संरक्षण'' या भावनेला अनुसरून, जनतेमध्ये कार्बन डायऑक्साईड कमी करण्यासाठी आणि ऑक्सिजन वाढवण्यासाठी झाडे लावण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमामुळे मुरुम शहरात पर्यावरण रक्षणाविषयी जनजागृती आणि सामाजिक बांधिलकीची भावना वृद्धिंगत झाल्याचे चित्र दिसून आले.

# भैरवनाथ कानडे यांच्या पुस्तकाची राज्यस्तरावर निवड

## पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते सत्कार

आरंभ मराठी | जळकोट

तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा येथील श्री .भैरवनाथ माध्यमिक विद्यालयातील महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त सहशिक्षक भैरवनाथ खंडू कानडे यांचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन समग्र शिक्षा आणि पीएमश्री अंतर्गत शालेय ग्रंथालय पुस्तक निर्मिती उपक्रम सन २०२४ – २५ साठी 'राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,पुणे यांच्यावतीने '' ओळख भारतीय नोबेल विजेत्यांची '' हे चरित्रात्मक पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. विदयार्थी शिक्षकांसाठी प्रेरणादायी अशा या ग्रंथालय पुरक पुस्तकाची राज्यातील शाळांच्या शालेय ग्रंथालयासाठी राज्यस्तरावर निवड झाली आहे. या निवडीबद्दल कानडे यांचा तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथे



आदिवासी पारधी सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने क्रांतीवीर चाफेकर बंधु स्मारक समितीचे अध्यक्ष तथा भारत सरकार पद्मश्री पुरस्कार विजेते गिरीश प्रभूणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महावीर कंदले, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडित भोसले, महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनिताताई भोसले, रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस एस.के. गायकवाड, महादेव गायकवाड, पत्रकार अरुण लोखंडे, बाबासाहेब बनसोडे, प्रबोध कांबळे, कुंदन भोसले, प्रदीप भोसले, बाळू भोसले, तनुजा काळे, सिद्धाराम चव्हाण, चित्रा काळे, सचिन शिंदे आदींची उपस्थिती होती.

# ग्रामसभेअभावी विकास कामाच्या विविध समित्या व ठराव घेण्यास दिरंगाई

## पळसप ग्रामपंचायतीमध्ये अंतर्गत राजकीय कुरापतीमुळे जनता वेठीस

आरंभ मराठी | पळसप

गावच्या विकासासाठी आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणारी गावच्या लोकांची सभा म्हणजे ग्रामसभा. धाराशिव तालुक्यातील पळसप ग्रामपंचायत मध्ये अंतर्गत राजकारणाच्या वादामुळे गावातील विकास कामासाठी निवड करण्यात येणाऱ्या विविध समित्या व विविध विकास कामाचे ठराव घेण्यास दिरंगाई होऊन कामास अडथळा निर्माण होत आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, पळसप ग्रामपंचायत मध्ये गावातील अंतर्गत राजकीय वादामुळे अनेक विकास कामाला खीळ बसत आहे. गावातील अनेक विकास कामे करत असताना ग्रामसभेमध्ये ठराव होणे अपेक्षित असते. ठरावानुसारच गावातील कामकाज करता येते. मात्र जर ग्रामसभा नाही झाली तर ग्रामस्थांनी वैयक्तिक लाभ आणि सार्वजनिक विकास कामे कशी करायची असा प्रश्न निर्माण होत आहे. सध्या ग्रामपंचायत मधील सरपंच, उपसरपंच ,सदस्य आणि इतर कर्मचारी यांच्यातील वादामुळे विकास कामाला मोठा अडथळा निर्माण होऊन विकास कामास खीळ बसून जनतेला वेठीस धरण्यात येण्याचा प्रकार घडत आहे. मागील महिन्यांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्रानुसार १ मे च्या ग्राम सभेमध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेत फलोत्पादन क्षेत्रात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना सहभाग करून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण नियोजन करण्यात आले असल्याचे पत्र आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेत सहभाग होण्यासाठी प्रोत्साहित करावे व त्यांच्या नावाचे ठराव वैयक्तिक लक्ष घालून येत्या एक मे २०२५ च्या ग्रामसभेत मंजूर करून घ्यावेत. हे ठराव लेबर बजेटमध्ये समाविष्ट केल्यास गावातील शेतकऱ्यांना रोजगार निर्माण होण्याबरोबरच फलोत्पादन क्षेत्रात ही प्रगती साधता येईल अशा पद्धतीचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयातून सर्व सरपंच यांच्या नावाने काढण्यात आले होते. मात्र ग्रामपंचायत कार्यलयावर याचा कसलाही फरक




पडला नाही. तसेच पळसप गावाची निवड नानाजी देशमुख कृषी संजीवनी या योजनेत झाली आहे. पुढच्या महिण्यात या योजनेची ऑनलाइन साईड सुरू होऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यासाठीची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.नानाजी देशमुख कृषी संजीवनी या योजनेत शेतकऱ्यांना शेती उपयोगी विविध योजनेचा लाभ घेता येतो ज्या माध्यमातून शेतकऱ्याची आर्थिक प्रगती होऊन शेतकऱ्यांना एक संजीवनी मिळण्यास मदत मिळणार आहे. आणि याचा आराखडा आणि सुक्ष्म नियोजन गावातील सरपंचाच्या अध्यक्षतेखाली जी ग्राम संजीवनी समिती नेमण्यात येणार आहे त्यामध्ये अल्पभूधारक शेतकरी , शेतकरी गट सदस्य , महिला शेतकरी अशी १३ सदस्यांची समिती असून सर्व अधिकारी समितीला देण्यात आलेले आहे.जेणेकरून कृषी विभागाच्या योजना राबवण्यास या समितीचे सहाय्य लाभेल. मात्र असे असताना केवळ

### सूचना देऊनही त्याचे पालन नाही

ग्राम कृषी संजवनी समिती नेमण्यासाठी पळसप मधील सरपंच व ग्राम सेवक यांना वेळोवेळी सूचना देऊनही आणखी समिती नेमली नसल्याने पोकराच्या योजना राबविण्यास अडथळा निर्माण होत आहे.

व्ही. एम. भूतेकर
मंडळ कृषी अधिकारी,येडशी

### लवकरच ग्रामसभा घेण्यात येईल

या दोन तीन दिवसांमध्ये ग्रामसभेची नोटीस काढून ग्रामसभा घेऊन राहिलेल्या विविध समित्या व ठराव घेण्यात येतील.

सद्धेश्वर काळे
सरपंच, पळसप.

गावातील राजकीय पुढाऱ्यांच्या वादामुळे ग्राम समितीच निवड झालेली नाही. जर नानाजी देशमुख कृषी संजीवनी ही योजना गावांमध्ये राबवायची असेल तर गावातील समिती महत्त्वाचे आहे ,आशा इतर समित्या आणि विविध ठराव ग्रामसभेत झाल्याशिवाय पुढील कार्यवाही शासकीय योजना संबंधी कुठलीही होत नाही! कृषी विभागाकडून अनेक वेळा या संबंधी गावचे सरपंच आणि ग्रामसेवक यांना समिती नेमण्यासाठी काळवण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. तरीही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे दिरंगाई थांबवून ग्रामसभा घेऊन विविध समित्या आणि ठराव घ्यावा जेणेकरून शासकीय योजनेचे लाभ शेतकऱ्यांना आणि इतर गावकऱ्यांना घेण्यास मदत होईल अशी जनतेकडून मागणी होत आहे.

# निवड श्रेणी प्रशिक्षणार्थीतर्फे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहारातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव येथे २ जुन ते १२ जुन या कलावधीत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण सुरु आहे. कला, क्रीडा व इतर विषय शिक्षक निवड श्रेणी प्रशिक्षण कुलातील प्रशिक्षणार्थींनी ५ जुन रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित साधून वृक्षारोपण केले. क्रीडा शिक्षक मालाजी काळे बलसुर, कलाध्यापक शेषनाथ वाघ धाराशिव, कार्यानुभव शिक्षक गुरुलिंगप्पा मडोळे जेवळी, क्रीडा शिक्षक विक्रम सांडसे व प्रशिक्षण कुलातील शिक्षक शिक्षिकांच्या संकल्पनेने वृक्षरोपण उपक्रम घेण्याचे नियोजन केले. यावेळी प्राचार्य दयानंद जटनुरे, भोसले हायस्कुलचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, प्रशिक्षणाचे समन्वयक प्रदीप घुले, सुचिता जाधव सुलभक, बाबासाहेब जगताप ,डॉ. विजय माने , मघमाला देशमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी सेवक इमामदार प्रशिक्षणार्थी शिक्षक विष्णू इंगळे, नरेंद्र पाटील , दत्तात्रय इनामदार, तुकाराम यादव , निवृत्ती मुळे , देवकते , विजय कुलकर्णी ,श्री पवार आदी शिक्षक शिक्षिका वृंद उपस्थित होते.